REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# भारतातील मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे आद्यप्रवर्तक : सयाजीराव गायकवाड

**Shri. Vilas Hanumant Ohol**
**Ph. D. Research Scholar , Solapur University, Solapur.**
**Study Center – Solapur Social Association College, Solapur.**

**सारांश :**

संयुक्त राष्ट्राचा ‘मानवी हक्क जाहिरनामा १९४८’ नुसार ‘शिक्षण’ हा एक मानवी हक्क मानला गेला. त्यामुळे जगातील सर्वच राष्ट्रांना आपल्या नागरिकांना या हक्कापासून दूर ठेवणे शक्य नव्हते. भारतीय राज्यघटनेत कलम ४५ नुसार शिक्षणाचा मार्गदर्शक तत्वात समावेश केला. भारतीय जनतेच्या वाढत्या राजकीय जागृतीमुळे भारतीय संसदेला शिक्षणाचा समावेश मुलभूत हक्कामध्ये करावा लागला. भारतीय संसदेन इ.स. २००२ मध्ये ८६ वी घटनादुरुस्ती करुन ‘६—१४’ वयोगटातील सर्वच मुलां—मुलींचा शिक्षण हा मुलभूत हक्क मानला. या मुलभूत हक्काच्या अंमलबजावणीसाठी संसदेने ‘बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९’ हा कायदा १ एप्रिल, २०१० पासून जम्मू—काश्मिर वगळून संपूर्ण देशभर लागू केला. या कायदयाचे मूळ शोधायचे झाल्यास बडोदयाचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक कार्यात ते सापडते. इ.स. १८९३ मध्ये त्यांनी आपल्या राज्यातील अमरेली प्रांतात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा आदेश दिला. भारताच्या इतिहासामध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा असा क्रांतीकारी कायदा करणारे सयाजीराव हे पहिले सत्ताधिश ठरले. त्यामुळे मोफत व सक्तीच्या शिक्षण कायदयाच्या अनुषंगाने त्यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या शोध निबंधातून करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

भारतीय संसदेने इ.स. २००२ मध्ये केलेल्या ८६ व्या घटनादुरुस्तीने ६ ते १४ वयोगटातील बालकांचा शिक्षण हा मुलभूत अधिकार मानला. या अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संसदेने ‘बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९’ हा कायदा १ एप्रिल, २०१० पासून जम्मू—काश्मिर वगळून संपूर्ण भारतभर लागू केला. पारंपारिक भारतीय समाजव्यवस्थेमध्ये शिक्षण ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. ब्रिटीशांच्या भारतातील आगमनाने भारतात आधुनिक शिक्षणाची सुरुवात झाली. यातून शिक्षित झालेल्या भारतातील काही सुधारकांना भारतीय समाजाच्या मागासलेपणाचे मूळ त्याच्या अज्ञानात आहे याची जाणीव झाली. त्यामुळे या सुधारकांनी राजकीय व्यवस्थेकडे सामान्य जनतेच्या शिक्षणाबाबत धोरणात्मक उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा सुरु केला. ब्रिटीश काळात भारत राजकीय दृष्टया दोन विभागात विभागला होता. ब्रिटीशांच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेला खालसा प्रदेश व



देशी संस्थानिकांच्या ताब्यातील संस्थानी प्रदेश अशी ही विभागणी होती. खालसा प्रदेशावर ब्रिटीशांची सत्ता होती तर संस्थानी प्रदेशात देशी संस्थानिक ब्रिटीशांचे मांडलिक म्हणून राज्यकारभार करत होते. ब्रिटीशांची मर्जी संपादन करणे व त्यांनी बोलावल्यास त्यांच्या मदतीला जायचे एवढीच या संस्थानिकांच्या कार्याची व्याप्ती होती. संस्थानिकांनी केलेल्या मदतीच्या बदल्यात ब्रिटीशांकडून त्यांना काही विशेष सवलती मिळत. ‘१९१४ च्या महायुध्दात संस्थानिकांनी वरिष्ठ सरकारला जी मदत केली त्याचे पारितोषिक म्हणून संस्थानी कारभाराच्या अंतर्गत

कारभारात दुर्लक्ष करण्याचे अधिराज सत्तेने ठरवले आणि त्याचा परिणाम संस्थानी राज्यकारभारात जास्त बेबंदशाही माजण्यात होऊ लागला.' १ त्यामुळे संस्थानी प्रजेच्या हिताकडे संस्थानिकांचे दुर्लक्ष होऊ लागले. याला काही मोजकीच संस्थाने अपवाद होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोककल्याणकारी कार्याचा वारसा बडोदयाचे सयाजीराव गायकवाड यांनी समर्थपणे सुरु ठेवला होता. त्यांनी केलेल्या विविध राजकिय, सामाजिक, शैक्षणिक सुधारणांमधून लोककल्याणाची त्यांची तळमळ दिसून येते. '' शिक्षण हाच सर्व सुधारणांचा पाया असून आजच्या परिस्थितीतून मुक्त होण्याचा आपला एकमेव मार्ग आहे.'' २ अशी सयाजीरावांची पक्की धारणा होती. शिक्षणाविना कोणत्याच सुधारणा निरर्थक आहेत म्हणून त्यांनी आपल्या प्रजेला शिक्षण देण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानामध्ये मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचा क्रांतीकारी कायदा केला. आज भारतात प्रचलित असलेल्या 'बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९' या कायदयाचे मूळ शोधायचे झाल्यास ते बडोदयाचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या राजकीय व शैक्षणिक सुधारणांत सापडते.

## १. भारतातील सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची स्वातंत्र्यपूर्व काळातील वाटचाल :—

### १.१ ब्रिटीशांचे शिक्षण विषयक धोरण :—

स्वातंत्र्यपूर्व भारतीय समाजव्यवस्थेमध्ये शिक्षणाचे स्वरुप व व्याप्ती अत्यंत मर्यादित होती. ब्रिटीशांच्या आगमनाने भारतात आधुनिक शिक्षणाची सुरुवात झाली. त्यातूनच सर्वांसाठी शिक्षण हा विचार मूळ धरु लागला. १८१३ च्या सनदी कायदयानुसार ईस्ट इंडिया कंपनीवर भारतीयांच्या शिक्षणासाठी प्रतिवर्षी १ लाख रुपये खर्च करण्याचे बंधन घातले गेले. "The East India Act 1813 was the first legislative admission of the right of education to participate in the public revenues of India." ३ अशा प्रकारे सरकारी महसुलातून लोकांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याची पहिली कायदेशीर शिफारस १८१३ च्या सनदी कायदयाने करण्यात आली. लॉर्ड मेकॉलेने इ.स. १८३५ मध्ये शिक्षणाचा 'पाझर सिध्दांत' मांडला. त्यानुसार समाजातील उच्च वर्गातील लोकांना शिक्षण दिल्यास ते कनिष्ठ स्तराकडे आपोआप पाझरत जाईल असे मेकॉलेचे मत होते. मात्र भारतामध्ये वरीष्ठ जातींमध्ये कनिष्ठांप्रती असलेल्या संकुचित भावनेमुळे शिक्षणाचा पाझर झाला नाही. १८५४ मधील चार्ल्स वुडसच्या शिक्षणविषयक खलित्यात प्राथमिक स्तरांपासून विद्यापीठ स्तरापर्यंत व्यापक व सर्व समावेशक शिफारशी करण्यात आल्या. त्यातील एका तरतुदीनुसार ''कोणत्याही सरकारमान्य शाळेमध्ये एखादया विद्यार्थ्याला तो विशिष्ट जातीचा आहे म्हणून प्रवेश नाकारण्यात येणार नाही.'' ४ या तरतुदीने भारतातील शिक्षण घेण्याच्या मार्गातील जात हा अडसर दूर करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र सक्तीच्या शिक्षणाचा विचार वुडच्या खलित्यात केला गेला नाही.इंग्लंडमध्ये १८७० मध्ये सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा झाला. याची वार्ता भारतात पोहोचली. त्यामुळे भारतात मोफत व सक्तीच्या शिक्षणाबाबत जागृती सुरु झाली. १८५४ च्या वुडच्या शिक्षणविषयक धोरणाची समिक्षा करुन नवीन उपाययोजना सुचविण्याच्या उद्देशाने १८८२ मध्ये शिक्षणविषयक हंटर कमीशन भारतात आले. या कमिशनने भारतातील विविध स्तरातील लोकांचे म्हणणे ऐकून घेतले. या कमिशनसमोर बाजू मांडताना महात्मा फुले यांनी ''लोकांच्या कराचा पैसा प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासाठी वापरावा उच्चशिक्षणासाठी नाही.'' ५ अशी मागणी करुन उपेक्षित जाती—जमातींच्या सर्वच मुला—मुलींना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

१८१३ चा सनदी कायदा, मेकॉलेचा १८३५ चा शिक्षण विषयक जाहिरनामा, १८५४ चा वुडचा खलिता, आणि १८८२ चे हंटर कमीशन या ब्रिटीश सरकारच्या शिक्षणविषयक धोरणाने भारतातील शिक्षणाचा पाया विस्तारत गेला हे जरी खरे असले तरी त्यापैकी कोणत्याही धोरणात भारतीयांच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत स्पष्ट भूमिका घेण्यात आली नाही.

### १.२ सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाबाबत भारतीयांचा पाठपुरावा :—

भारताच्या इतिहासात सर्वप्रथम १८८२ मध्ये महात्मा फुले यांनी ब्रिटीश सरकारकडे मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी केली. त्याच वर्षी बडोदयाचे महाराजा सयाजीराव पुणे येथे आले होते. सत्यशोध रामचंद्र धामणस्कर यांनी महात्मा फुले व महाराजा सयाजीराव यांची भेट घडवून आणली. उभयतांमध्ये बऱ्याच विषयांवर चर्चा झाली. बडोदयाच्या ''या तरुण नरेशाला महात्मा फुलेंनी त्यावेळी काही मार्गदर्शन केले.'' **६** या भेटीतच महात्मा फुलेंच्या सामाजिक व शैक्षणिक विचारांचा सयाजीरावांवर चांगलाच प्रभाव पडला. बडोदयाला परतल्यानंतर इ.स. १८८२–८३ मध्ये सयाजीरावांनी सोनगड सारख्या आदिवासी भागात एक शाळा व एक वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय घेतला. महात्मा फुलेंची भेट व मार्गदर्शनानंतर महाराजा सयाजीरावांनी शिक्षणाच्या क्षेत्रात सुरु केलेल्या विधायक कार्यावरुन ''सयाजीराव हे महात्मा फुले यांचेच अनुयायी.'' **७** हा प्रा. एन. डी. पाटील यांचा निष्कर्षही समर्पक वाटतो. सयाजीरावांनी आपल्या शिक्षणविषयक सुधारणा चालुच ठेवल्या. सयाजीरावांनी १६ मार्च, १८९३ मध्ये एक हुकूम काढून अमरेली शहर व प्रांतातील ९ गावात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे आदेश दिले. असा आदेश देणारे सयाजीराव हे भारताच्या इतिहासातील पहिले राज्यकर्ते ठरले. ''संपूर्ण हिंदुस्थानात शिक्षणाबद्दल इतका महत्वाचा प्रश्न हाती घेण्यात बडोदे संस्थानचा पहिला नंबर होता व हा प्रयत्न कितपत यशस्वी होतो हे पाहण्यासाठी सर्व हिंदुस्थानचे डोळे बडोदयाकडे लागले होते. **८** अमरेली प्रांतातील सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना यशस्वी झाल्यानंतर हा कायदा इ.स. १९०६ मध्ये संपूर्ण बडोदे राज्यात लागू करण्यात आला.

भारताच्या राजकीय हक्कांसाठी आग्रही असलेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसनेही मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणात लक्ष घालण्यास सुरुवात केली. १९०६ च्या कोलकत्ता कॉंग्रेस अधिवेशनामध्ये भारतीयांच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. " Government should take immediate step for making primary education free and gradually compulsory all over the country." **९** अशा प्रकारे मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा विषय भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पटलावर आला. कॉंग्रेसचे नामांकीत नेते गोपाळ कृष्ण गोखले यांनी या विषयाला मोठया प्रमाणात चालना दिली. वरिष्ठ कायदे मंडळाचे सदस्य असलेल्या नामदार गोखलेंनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला. ''१८ मार्च, १९१० मध्ये वरिष्ठ कायदेमंडळात सक्तीच्या व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा ठराव गोखलेंनी मांडला.'' **१०** त्यानंतर १६ मार्च, १९११ व २७ फेब्रुवारी, १९१२ असे सलग तीन वर्षे गोखलेंनी सक्तीच्या व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे ठराव वरिष्ठ कायदेमंडळात मांडले. १९१२ मध्ये ना. गोखलेंनी मांडलेला सक्तीच्या व सार्वत्रिक शिक्षणाचा ठराव कायदे मंडळातील सरकारी सदस्य व जमिनदारांच्या प्रतिनिधींनी '' ३८ विरुध्द १३ अशा मताधिक्क्याने फेटाळून लावला. **११** ना. गोखलेंनी मांडलेला सक्तीच्या व सार्वत्रिक शिक्षणाचा ठराव जरी फेटाळण्यात आला तरी त्यामुळे सरकारच्या शिक्षणविषयक धोरणांना चालना मिळाली. संपूर्ण देशात लोकशिक्षणाच्या कार्यात गती आली. १९१३ पासून देशात विविध प्रांत व संस्थानिकांनी शिक्षणाबाबत विविध योजना सुरु केल्या. मात्र या सर्वांच्या कितीतरी आधी सयाजीरावांनी आपल्या राज्यात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना सुरु करुन यशस्वी करुन दाखविली. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक विचार व कार्य तत्कालीन सर्वच राज्यकर्त्यांना दिशादर्शक ठरले.

## २. सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य :

### २.१ सयाजीरावांचे शिक्षणविषयक विचार :–

सयाजीराव गायकवाड हे वयाच्या १२ व्या वर्षी बडोदयाचे महाराजा झाले. त्याच वर्षी ते प्रथमच शाळेत दाखल झाले. त्यांनी ६ वर्षाचा औपचारिक शिक्षणाचा अभ्यासक्रम माता जमनाबाई यांच्या देखरेखीखाली व गुरु एफ. एच. इलियट यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. इ. स. १८८१ मध्ये म्हणजेच वयाच्या १८ व्या वर्षी बडोदयाची संपूर्ण सत्ता महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या हाती आली. अगदीच संस्कारक्षम वयामध्ये सयाजीरावांवर महात्मा फुलेंच्या सामाजिक व शैक्षणिक विचारांचा प्रभाव पडला. इ. स. १८८७ मध्ये सयाजीरावांनी प्रथमच युरोपचा दौरा केला. युरोपीय राष्ट्रांनी केलेल्या प्रगतीचे रहस्य त्यांनी राबवलेल्या शैक्षणिक सुधारणांत आहे हे सयाजीरावांच्या लक्षात आले. यावरुन भारताच्या

मागासलेपणाचे मूळ भारतातील सार्वत्रिक शिक्षणाचे अभाव हेच आहे अशी त्यांची पक्की धारणा झाली. म्हणूनच सयाजीराव म्हणतात ''हत्तीएवढया दगडांना ज्याप्रमाणे लोखंडाची तरफ हलवून बाजूला करु शकते त्याप्रमाणे असंख्य युगापासून त्या दगडा सारखाच निश्चल पडून राहिलेल्या या अफाट देशाला हलवू शकणारी चेतना देऊ शकणारी शिक्षण ही एकच तरफ आहे.'' **१२** भारतासारख्या सर्वच क्षेत्रात मागासलेल्या देशात शिक्षणाची उपेक्षा करणे देशाला आणखीनच अधोगतीकडे घेऊन जाण्यासारखे होईल. त्यामुळे शिक्षणाकडे राष्ट्रोध्दाराचे एक साधन म्हणून पाहिले पाहिजे, असे सयाजीरावांचे मत होते.

शिक्षीत समाजच आपल्या अधिकारांप्रती अधिक जागृत असतो म्हणून सयाजीराव म्हणतात ''लोकसमुदायाला प्राथमिक शिक्षण दया. तेव्हा अधिकाराची मागणी मागोमाग लगेच येईल.'' **१३** प्रजा शिक्षीत, शहाणी असेल तर राजदंडाची भिती घालणाऱ्या कायदयाची आवश्यकता भासणार नाही. जे राष्ट्र आपल्या सर्व नागरिकांना भेदभावरहित व कोणत्याही निर्बंधाविना शिक्षणाचा फायदा मिळविण्याची संधी देते, ते राष्ट्र इतर राष्ट्रांच्या मानाने खूपच प्रगत होते. असे त्यांचे मत होते. सर्वच सामाजिक सुधारणांचे मूळ शिक्षणात आहे. त्यामुळे केवळ लिहिता वाचता येणे किंवा सरकारी नोकऱ्यात दाखल होणे एवढयापुरते शिक्षण मर्यादित असता कामा नये. शिक्षणातून आपल्या समाजाचे मागासलेपण दूर करण्यासाठी झटणारे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत अशी सयाजीरावांची प्रामाणिक इच्छा होती. मेकॉलेच्या पाझर सिध्दांतानुसार शिक्षण उच्चवर्णियांकडून कनिष्ठांकडे झिरपणार नाही म्हणून महात्मा फुलेंचा उच्चवर्णियांच्या उच्चशिक्षणाला विरोध होता. सयाजीरावांनी मात्र कनिष्ठ वर्गातील काही तरुणांना उच्चशिक्षीत केले. त्यामुळे त्यांच्याकडील ज्ञान आपल्या मागास समाज बांधवाकडे पाझरु लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे याचे फार मोठे उदाहरण आहेत. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत जोपर्यंत शिक्षण पोहोचत नाही, तोपर्यंत राष्ट्रांची प्रगती होत नाही. म्हणून सयाजीराव म्हणतात, "No ultimate solution of our problem will be reached until school have been provided in every village, and education is taken to the very threshold of the people." **१४** प्रत्येकाच्या उंबरठयापर्यंत जोपर्यंत शिक्षण जात नाही, तोपर्यंत राष्ट्रांचा उध्दार होणार नाही. म्हणूनच सयाजीरावांनी आपली संपूर्ण हयात शिक्षणातून राष्ट्रोध्दाराच्या कार्यात घालवली.

## २.२ सयाजीरावांचे शिक्षणविषयक कार्य :—

गुरु एफ. एच. इलियट यांची मेहनत, दिवाण सर टी माधवराव यांची साथ आणि महात्मा फुलेंच्या विचारांचा प्रभाव यामुळे सयाजीरावांच्या शिक्षणविषयक कार्याचा पाया भक्कम बनला. सहा वर्षाचा औपचारिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर २८ डिसेंबर, १८८१ रोजी सयाजीरावांनी बडोदयाची संपूर्ण सत्ता आपल्या हाती घेतली. त्यावेळी त्यांचे वय अवघे १८ वर्षे होते. १८८० पर्यंत बडोदे संस्थानाची शिक्षणाची स्थिती खूपच चिंताजनक होती. ''१८८० साली शाळांची संख्या १८० असून विद्यार्थ्यांची संख्या १७४६५ होती.'' **१५** राज्यकारभार हाती घेतल्यानंतर इ.स. १८८२ पासून सयाजीरावांनी संपूर्ण राज्याचा दौरा सुरु केला. सोनगड या आदिवासी भागातील लोकांचे मागासलेपण त्यांनी जवळून पाहिले. शिक्षण हाच त्यांच्या मागासलेपणावर एकमेव उपाय आहे असे समजून इ.स. १८८२—८३ मध्ये या भागात एक शाळा व एक वसतीगृह सुरु केले. अशा प्रकारे सयाजीरावांनी सरकारी खर्चाने प्रजेच्या शिक्षणाची सुरुवात केली. इ. स. १८८५ मध्ये आपल्या प्रजेच्या शिक्षणाबाबत आपल्या मनातील संकल्प सांगताना सयाजीराव म्हणतात, ''दरवर्षी ३० शाळा सुरु करण्यात याव्यात शाळेच्या इमारतीसाठी ६०००० रुपये खर्च करण्यात यावेत. हरेक शाळेत एक छोटे वस्तूसंग्रहालय असावे. शाळेत शिक्षण घेण्यासाठी मुली मोठया संख्येने याव्यात म्हणून मुलींच्या शाळेत स्त्री शिक्षकांचीच नेमणूक करण्यात यावी. समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे.'' **१६** शिक्षणाबाबत सयाजीरावांची वरील अपेक्षा म्हणजे त्यांच्या भावी शैक्षणिक कार्याचा आराखडाच होता. खेडेगावात शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी म्हणून इ. स. १८९१ मध्ये त्यांनी ग्राम्य शाळा सुरु करण्याचा आदेश दिला. त्यावेळी खेडेगावात अस्तित्वात असलेल्या सर्व खाजगी शाळांना ग्राम्य शाळेचा दर्जा दिला व त्या खाजगी शाळेतील शिक्षकाला सरकारी शिक्षण मानण्यात आले. तसेच या नवीन ग्राम्य शाळांवर देखरेख ठेवण्यासाठी सयाजीरावांनी या शाळा देशी शिक्षणखात्याच्या ताब्यात दिल्या. या सर्व शाळांमधून एकच अभ्यासक्रम शिकवण्याचा आदेश देऊन

शिक्षणातून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परंतु सयाजीरावांचे शिक्षण विषयक कार्य एवढयावरच थांबले नाही. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केल्याशिवाय राज्यातील शिक्षणाचे प्रमाण वाढणार नाही हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाबाबत अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना प्रायोगीक तत्वावर राबवून तिच्या यशस्वीतेवर पुढील विस्तार करावा अशी शिफारस केली. त्यानुसार ''१६ मार्च, १८९३ रोजी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याबाबतचा कायदा महाराजांच्या हुकूमाने अंमलात आला. हा कायदा प्रथम अमरेली प्रांतात अमरेली शहर व अमरेली तालुक्यातील ९ गावासच लागू करण्यात आला.'' **१७** याबाबत आदेश देताना सयाजीरावांनी आपले दिवाण मनीभाई जशभाई देसाई यांना पत्रातून आपली सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना समजावून सांगीतली. योजनेच्या यशस्वीतेसाठी आवश्यक संसाधने, अंमलबजावणीची पध्दत, लोकांची मानसिकता व आपले प्रामाणिक प्रयत्न यांचा विचार करुन ही महत्वाकांक्षी योजना यशस्वी करण्याचे आदेश दिले. अमरेली प्रांतातील ही प्रायोगिक योजना यशस्वी होत असल्याचे दिसताच इ. स. १९०६ पासून ती संपूर्ण बडोदे राज्यात लागू करण्याचे आदेश सयाजीरावांनी दिले. भारताच्या इतिहासातील ही एक अत्यंत क्रांतीकारी घटना आहे.

## २.३ सयाजीरावांचे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे धोरण :—

सयाजीरावांनी सुरु केलेल्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेने समाजातील सर्वच घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. या योजनेमध्ये ७ ते १२ वयोगटातील मुले व ७ ते १० वयोगटातील मुली यांचा समावेश होता. सयाजीरावांनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेली सक्ती ही देखील क्रांतीकारी घटना आहे. कारण मुलींच्या शिक्षणाबाबत महात्मा फुलेंना झालेला त्रास सयाजीरावांना माहित होता. शिवाय ना. गोखलेंनी सक्तीच्या व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा वरिष्ठ सभागृहात जो पहिला ठराव मांडला त्यामध्ये मुलींच्या शिक्षणाचा समावेश नव्हता. त्यांच्या ठरावातील दुसराच मुद्दा होता. “ Compulsion should be apply to boys and not to girls.” **१८** यावरुन मुलींच्या शिक्षणाबाबतची तत्कालीन उदासीनता स्पष्ट होते. उपेक्षित जातीजमातीतील मुले व सर्वच जातीतील मुली यांच्या शिक्षणाची तरतूद सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षण योजनेत करुन सयाजीरावांनी सर्वांनाच शिक्षणाची समान संधी उपलब्ध करुन दिली. सक्तीच्या शिक्षण योजनेतून प्रत्येक मुलाला वाचन, लेखन व अंकगणित ही कौशलये आलीच पाहिजे असा सयाजीरावांचा आग्रह होता. शाळा योग्य वयातील प्रत्येक विद्यार्थ्यांने शाळेत हजर राहिलेच पाहिजे अशी सक्ती होती. कायदयातील मान्य दिवसापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्यास पालकांना दंडाची तरतूद होती. शेतीच्या कामाच्या दिवसात शेतकऱ्यांच्या मुलांसाठी दंडात सूट देण्यात आली होती. पडदा पध्दत पाळणाऱ्या लोकांनीही आपल्या मुलींना शाळेत पाठवून कायदेशीर शिक्षण पूर्ण करण्याची सक्ती होती. शालेय कामकाज व विद्यार्थ्यांची प्रगती यांचे मुल्यमापन करण्यासाठी पर्यवेक्षीय यंत्रणा सतर्क होती. सक्तीच्या व मोफत शिक्षण योजनेचा ठराविक वेळेनंतर आढावा घेऊन काही नवीन नवीन बदल स्विकारण्यात आले. अशा प्रकारे सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या योजनेतून सयाजीरावांनी आपल्या राज्यातील प्रत्येक घटकाला शिक्षणाची समान संधी उपलब्ध करुन दिली. या योजनेच्या यशाचा अंदाज खालील तक्त्यावरुन येऊ शकतो.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | घटना | वर्ष | शाळांची संख्या | शाळेत दाखल विद्यार्थ्यांची |
|---|---|---|---|---|

| | | | | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सत्ता हाती घेण्यापूर्वी **१९** | १८८० | १८० | १७४६५ |
| २ | ग्राम्य शाळा योजना व सक्तीच्या शिक्षणाच्या प्रायोगिक योजनेनंतर**२०** | १९०४–०५ | १२४३ | ८१६४९ |
| ३ | सक्तीचे शिक्षण योजना राज्यभर लागू केल्यानंतर **२१** | १९३८–३९ | २४३९ | २,५९,२८८ |

सयाजीरावांच्या शैक्षणिक कार्याचे विविध टप्प्यांवर अवलोकन केल्यास बडोदयाच्या शैक्षणिक स्थितीत संख्यात्मक वाढ कशी झाली हे लक्षात येते. सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या योजनेमुळे बडोदयाची गुणात्मक स्थितीही सुधारली. भारताच्या इतिहासात सर्वात प्रथम आपल्या राज्यात ही योजना लागू करुन आपल्या राज्याची शैक्षणिक क्षेत्रात संख्यात्मक व गुणात्मक प्रगती केली. बडोदा गॅझेटमध्ये सयाजीरावांच्या या आद्य प्रयत्नाचा स्पष्ट उल्लेख आढळतो. ''सयाजीराव गायकवाड यांची सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना हा अखिल भारतातील आद्य प्रयत्न होता.'' **२२**

सयाजीरावांची सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना यशस्वी झाली कारण या योजनेच्या प्रत्येक घटकावर सयाजीरावांचे बारीक लक्ष होते. जनतेच्या शिक्षणावर खर्च करण्यात सयाजीरावांनी कधीही हात आखडता घेतला नाही. ''ब्रिटीश इंडियामध्ये जेव्हा ब्रिटीश राज्यकर्ते शिक्षणासाठी दरडोई १ पेनी खर्च करीत होते, तेव्हा बडोदयाचा राजा आपल्या प्रजेवर ६ पेनी खर्च करत होता.'' **२३** शिक्षणातील अभिनव प्रयोग, त्याच्या यशस्वीतेसाठी सक्षम पाठपुरावा, यामुळे बडोदे हे भारताची शिक्षणविषयक प्रयोगशाळा बनले होते. त्यामुळेच सयाजीरावांचे चरित्रकार सार्जंट फिलिप म्हणतात –''बडोदे राज्य भारतातील प्राथमिक शिक्षण क्षेत्राचे प्रणेते ठरले.'' **२४** बडोदयात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षण योजनेची अंमलबजावणी करताना आलेल्या अडचणी त्यावर केलेल्या उपाययोजना व त्यातून मिळालेले यश देशातील सत्ताधिशांना दिशादर्शक ठरणारे आहे म्हणूनच जेष्ठ शिक्षणतज्ञ जे. पी. नाईक म्हणतात – ''सरकारने सक्तीचे मोफत शिक्षण योजना यशस्वीरित्या राबविण्यासाठी महाराज सयाजीराव गायकवाड यांचा आदर्श डोळयासमोर ठेवला पाहिजे.''**२५**

## निष्कर्ष :–

सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राज्यातील जनतेला सक्तीचे मोफत व समान अभ्यासक्रम असलेले प्राथमिक शिक्षण उपलब्ध करुन दिला. त्यामुळे सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळाली. सक्तीच्या शिक्षणाची योजना लागू करण्यापूर्वी राज्यातील सर्व खाजगी शाळांचे सरकारी शाळेत रुपांतर केले. तेथील शिक्षकांना सरकारी शिक्षणाचा दर्जा देऊन त्यांना त्यांच्या नोकरीची हमी दिली. वाढत्या शाळांच्या संख्येबरोबरच शिक्षकांची वाढती गरज लक्षात घेऊन शिक्षक प्रशिक्षण केंद्र सुरु केले. महिला शिक्षिकांसाठी फिमेल ट्रेनिंग स्कूल सुरु केले. मुलांना शाळेत पाठवणे व ते नियमित जाते का हे पाहण्यासाठी पालकांची जबाबदारी निश्चित केली. पाल्य गैरहजर राहिल्यास पालकांवर दंड बसवला. मागास जाती व महिला या कायमच उपेक्षित असणाऱ्या घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध प्रोत्साहनपर योजना सुरु केल्या. बडोदयातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे कार्य सयाजीरावांनी केले. त्यांचे शिक्षण विषयक आदर्श विचार, उपेक्षितांच्या शिक्षणाप्रती असलेली वचनबध्दता, सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा यशस्वी आद्यप्रयत्न यामुळे भारतातील मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे सयाजीराव गायकवाड हे आद्यप्रवर्तक ठरतात.

## संदर्भ सूची :–

१. संस्थानातील लोकशाही लढा – वि. अ. पटवर्धन पृष्ठ. ५.
२. सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड – १ पृष्ठ. ३०. साकेत प्रकाशन

३. History of Elementary Education in India : J. M. Sen पृष्ठ.६२.
४. शिक्षण : संपादन प्रा. विलास रणसुभे पृष्ठ.९.
५. महात्मा फुले आणि शिक्षण : डॉ. आ. ह. साळुंखे पृष्ठ.३९.
६. महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची संपादन – बाबा भांड पृष्ठ. ५१८
७. शिक्षण : संपादन प्रा. विलास रणसुभे पृष्ठ.२४.
८. सयाजी गौरवग्रंथ १९३३ वाढदिवस मंडळ, पृष्ठ.११०.
9- Compulsary Education Article – Ajit Mondal.
१०. भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास : डॉ. प्रिती पाटील, डॉ. शारदा शेवनेकर पृष्ठ.९०.
११. History of Elementary Education in India : J. M. Sen पृष्ठ.१९३.
१२. सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड–१, साकेत प्रकाशन पृष्ठ.२७.
१३. म्हाराजा सयाजीराव आणि स्त्रीशिक्षण : सौ. मंदा हिंगुराव, अनुवाद–सुषमा करोगल
१४. महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची संपादन–बाबा भांड पृष्ठ. ८०.
१५. सयाजी गौरवग्रंथ १९३३ वाढदिवस मंडळ, पृष्ठ. १०९.
१६. सयाजीराव गायकवाड : व्हि. के. चावडा पृष्ठ.३४.
१७. सयाजी गौरव ग्रंथ – १९३३ वाढदिवस मंडळी पृष्ठ. ११०.
१८. History of Elementary Education in India : J. M. Sen पृष्ठ. १८८.
१९. सयाजी गौरवग्रंथ –१९३३ वाढदिवस मंडळी पृष्ठ.११०.
२०. Compulsary Primary Education in Baroda State – J. P. Naik पृष्ठ. १.
२१. Ibid पृष्ठ. १.
२२. सयाजीराव गायकवाड व्ही. के. चावडा पृष्ठ. ३५.
२३. शिक्षण संपादन प्रा. विलास रणसुभे पृष्ठ. २४.
२४. महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण – सौ. मंदा हिंगुराव पृष्ठ. ७८
अनुवाद – डॉ. सुषमा करोगल
२५. जेंव्हा गुराखी राजा होतो – श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड – निंबाजीराव पवार पृष्ठ. ३२.